| | |
|---|---|
| MHST080000882012 | दाखल दिनांक – १०.०२.२०१२<br>नोंदणी दिनांक – १०.०२.२०१२<br>निकाल दिनांक – ०९.०६.२०२६<br>कालावधी – १४ वर्षे ०३ महिने २९ दिवस |

**मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खंडाळा, ता. खंडाळा, जि. सातारा यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी – श्रीमती एस. जी. कुवळेकर)**

**नियमीत फौजदारी खटला क्र.१६/२०१२**
**निशाणी क्र.३३**

| | |
|---|---|
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन<br>लोणंद पोलीस स्टेशन, गु.र.नं.१२७/२०११ |
| अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता | श्रीमती सुलभा द. भोसले. |
| आरोपी | १. राजु ऊर्फ निरंजन प्रकाश नाईक,<br>वयः ३२ वर्षे, व्यवसायः भाजी विक्री,<br>राहणारःवाठार कॉलनी, ता. खंडाळा, जि. सातारा.<br>२. राकेश सुरेश नाईक,<br>वयः – वर्षे, व्यवसायः –,<br>राहणारः भोर, ता. भोर, जि. पुणे<br>सध्या राहणारः वाठार कॉलनी, ता. खंडाळा, जि. सातारा. |
| आरोपी क्र.१ तर्फे विधिज्ञ | श्री. एस. जे. वायदंडे. |

## भाग –ब

| | |
|---|---|
| अपराध घडला दिनांक | २५.१२.२०११ |
| पहिली खबर दिनांक | २६.१२.२०११ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | १०.०२.२०१२ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २३.०२.२०१२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २५.०५.२०१२ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | ०९.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०९.०६.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

## आरोपींचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणीदरम्य ान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी. आर. पी. सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राजु ऊर्फ निरंजन प्रकाश नाईक | ३०.०१. २०१२ | १०.०२. २०१२ | भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |
| २. | राकेश सुरेश नाईक | फरार | फरार | भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |

## भाग – क
## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी/बचाव/न्यायालयाचे साक्षीदार

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | | साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | |
| १. | संतोष बाळासाो महांगरे | फिर्यादी | २० |
| २. | लक्ष्मण सिताराम साळुंखे | घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच | २२ |
| ३. | स्वाती संतोष महांगरे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | २५ |

## अभियोगपक्षाचे/बचाव/कोर्ट निशाणी

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | २१ | पुरवणी जबाब |
| २. | २३ | जप्ती पंचनामा |

## ड. मुद्देमाल

| अनुक्रमांक | मुद्देमाल क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | एम.आर.नं.३३/२०१२ | गुन्हा घडलेले ठिकाणी फरशीवर पडलेले रक्ताचे डाग कापसाचा बोळा ओला करुन काढून घेतलेले व एका काचेच्या बाटलीत ठेवलेले. |
| २. | एम.आर.नं.३३/२०१२ | दोन लोखंडी सत्तुर |
| ३. | एम.आर.नं.३३/२०१२ | पायातील काळेबंदाची चप्पल |

## न्यायनिर्णय
## (घोषित दिनांक ०९ जून, २०२६)

आरोपींवर भारतीय दंड विधान कलम ३२४ सह कलम ३४ (सोईकरीता भा.द.वि. असे संबोधण्यात येत आहे) अन्वये दोषारोप ठेवण्यात आलेला आहे.

<u>अभियोगपक्षाची हकिगत थोडक्यात खालील प्रमाणे</u> –

<u>०२.</u> फिर्यादी संतोष बाळासाहेब महांगरे यांनी सदर घटनेची फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीमध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, दिनांक २५.१२.२०११ रोजी रात्री ८.३० वाजेच्या सुमारास आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीसोबत झालेल्या किरकोळ भांडणाचे कारणावरुन वाठार कॉलनी येथे फिर्यादीच्या घरासमोर येऊन फिर्यादीस शिवीगाळ व दमदाटी करुन फिर्यादीच्या डोक्यात सत्तुराने मारहाण केली. त्यामुळे, फिर्यादीने आरोपींविरुद्ध तक्रार दाखल केली.

<u>०३.</u> त्यानंतर, लोणंद पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं.१२७/२०११ हा भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपासी अधिकारी यांनी साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे घेतले. तपासाअंती आरोपी क्र.१ विरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

<u>०४.</u> माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपी क्र.१ विरुध्द निशाणी क्र.१४ वर भारतीय दंड विधान कलम ३२४ अन्वये दोषारोप निश्चित केले. त्यातील माहिती त्यांना मराठी भाषेत समजावून सांगितली. ती त्यांना समजल्यानंतर त्यांची जबानी नोंदविण्यात आली. आरोपी क्र.१ ने त्याच्याविरुध्द निश्चित केलेले दोषारोप नाकारले व संपरिक्षेची मागणी केली. आरोपी क्र.२ हा गुन्हा दाखल केल्यापासून फरार आहे. त्यामुळे, लोणंद पोलीस स्टेशन यांनी दिनांक १०.०२.२०१२ रोजी निशाणी क्र.४ अन्वये आरोपी क्र.२ हा गुन्हा घडल्यापासून फरारी असल्याने व सदर आरोपीविरुद्ध पुरावा झालेने त्याचेविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यास परवानगी मागितली व परवानगी मिळाल्यानंतर सदर आरोपी क्र.२ विरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले. परंतु, सदर आरोपी क्र.२ आजतागायत मिळून न आल्याने त्याचेविरुद्ध दोषारोप ठेवण्यात आला नाही.

**<u>०५.</u>** प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षातर्फे तीन साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदवण्यात आली. सदर खटल्यामध्ये साक्षीदार क्र.१ संतोष बाळासाो महांगरे यांचा सरतपास दिनांक २५.०५.२०१२ रोजी व दिनांक ०८.०६.२०१२ रोजी सदर साक्षीदाराचा उलटतपास, तसेच साक्षीदार क्र.२ लक्ष्मण सिताराम साळुंखे यांची साक्ष दिनांक ०८.०६.२०१२ रोजी व साक्षीदार क्र.३ स्वाती संतोष महांगरे यांची साक्ष दिनांक १०.०७.२०१२ रोजी अभिलेखावर नोंदवण्यात आली. त्यानंतर, सदर खटल्यातील आरोपी क्र.१ हा फरारी झाला. त्यानंतर, सदर आरोपींविरुद्ध स्थायी अजामीनपात्र अधिपत्र व जाहीरनामा जारी केल्याचे दिसून येत आहे. परंतु, अभियोग पक्षास सर्व प्रयत्न करुनही आरोपींना सदर कामी हजर ठेवता आलेले नाही. प्रस्तुत प्रकरण १४ वर्षांपेक्षा जास्त जुने आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अभियोग पक्षास सर्व प्रयत्न करुनही आरोपींना सदर खटल्याचे कामी हजर ठेवता आलेले नाही. त्यामुळे, आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदवण्यात आले नाही.

**<u>०६.</u>** अभियोग पक्षाकरीता विद्वान सरकारी वकील श्रीमती सुलभा द. भोसले यांचा युक्तीवाद ऐकला.

**<u>०७.</u>** अभियोग पक्षाच्या कथेवरुन माझ्यासमोर खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले व त्यावर मी पुढीलप्रमाणे कारणांसहीत निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दिनांक २५.१२.२०११ रोजी रात्री २०.३० वाजेच्या सुमारास मौजे वाठार कॉलनी, ता. खंडाळा, जि. सातारा गावच्या हद्दीत फिर्यादीच्या राहते घरासमोर अंगणात आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | सत्तुरासारख्या प्राण घातक हत्याराने मारहाण करुन आपखुशीने गंभीर दुखापत पोहोचवली व त्यायोगे त्यांनी भारतीय दंड विधान कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला ? | |
| २. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दे क्रमांक १ करिता</u> –**

<u>०८.</u> अभियोग पक्षाने आरोपीविरुद्धचा गुन्हा शाबीत करण्यासाठी एकूण ०३ साक्षीदार तपासले. अभियोग पक्षाने फिर्यादी संतोष बाळासाो महांगरे (अ.सा.क्र.१) यांना निशाणी क्र.२० वर तपासले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या तक्रारीप्रमाणे साक्ष दिली. सदर साक्षीदाराच्या उलटतपासामध्ये असे आले आहे की, त्यांचे मूळ गाव वाठार कॉलनी नसून भादे आहे. त्यांची सासरवाडी देखील भादे हीच आहे. परंतु, ते त्यांच्या जन्मापासून वाठार कॉलनी येथे राहतात. तेथे त्यांचे टायर पंक्चर काढण्याचे दुकान आहे. त्यांना उलटतपासात विचारण्यात आलेल्या इतर प्रश्नांची उत्तरे त्यांनी नाकारली.

<u>०९.</u> अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र.२ लक्ष्मण सिताराम साळुंखे (अ.सा.क्र.२) हे घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच आहेत. त्यांच्या सरतपासात असे आले आहे की, दिनांक २६.१२.२०११ रोजी ते जेवण्यासाठी संतोष महांगरे यांच्या घरासमोरुन जात असताना पोलीसांनी त्यांना पंचनाम्यासाठी बोलावले. त्यांच्या सरतपासात पुढे असे आले आहे की, संतोष महांगरे यांचे घर पूर्वाभिमुखी होते. त्यांच्या घराला डिडोनिया झाडाचे कुंपण केलेले होते. घराला अंगण असून अंगणाला सारवलेली फरशी होती. अंगणात रक्त पडलेले

होते. डिडोनिया झाडाजवळ अंगणात दोन लोखंडी सत्तूर पडलेले होते. तसेच, तेथे पॅरॅगनची एका पायातील चप्पल पडलेली होती. त्यानंतर, पोलीसांनी रक्ताचे डाग कापसाने टिपून घेतले. त्यानंतर, पोलीसांनी त्यांच्या समक्ष निशाणी क्र.२३ वरील पंचनामा लिहीला व त्यावर त्यांची सही घेतली. त्यावेळी, तेथे रमेश साळुंखे व संतोष महांगरे हे उपस्थित होते. संतोष महांगरे यांच्या घरासमोरुन दक्षिणोत्तर रस्ता जातो व त्यांच्या घराच्या आजुबाजूला घरे आहेत. सदर पंचनामा हा ४.०० ते ४.१५ वाजेपर्यंत झाला.

**१०.** त्यांच्या उलटतपासात त्यांनी असे कथन केले आहे की, ज्या पोलीसांनी त्यांना बोलावले ते पोलीस त्यांच्या ओळखीचे नव्हते. त्यांच्या उलटतपासात त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, पोलीसांनी त्यांच्या समक्ष मोजमापे घेतली. परंतु, सदर मोजमापे कोठून घेतली, काय घेतली हे त्यांना सांगता येणार नाही. तसेच, त्यांनी पुढे असेही कथन केले आहे की, अंगणात रक्ताचे थेंब पडलेले होते. त्यांना पोलीसांनी त्यांच्या नेमक्या किती सह्या घेतल्या हे सांगता आले नाही. त्यांना उलटतपासात विचारण्यात आलेल्या इतर प्रश्नांची उत्तरे त्यांनी नाकारली.

**११.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र.३ स्वाती संतोष महांगरे (अ.सा.क्र.३) ह्या प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून त्यांच्या सरतपासात असे आले आहे की, सदर घटना दिनांक २५.१२.२०११ रोजी सायंकाळी ८.३० वाजेच्या सुमारास वाठार कॉलनी येथे घडली. दिनांक २५.१२.२०११ रोजी सायंकाळी ८.३० वाजेच्या सुमारास त्या व त्यांचे पती घरी जेवत होते. त्यावेळी, आरोपींनी त्यांच्या घराबाहेरुन त्यांच्या पतीला आवाज दिला व घराबाहेर बोलावले. त्यानंतर, आरोपी ५–१० मिनीटे शिव्या देत राहिला. त्या घटनेच्यावेळी दरवाज्यात उभ्या होत्या. त्यावेळी, आरोपींनी शर्टमधून सत्तूर काढून त्यांच्या पतीच्या डोक्यात मारला.

त्यावेळी, आरोपीसोबत त्याचा मित्र देखील होता. त्याचे नाव त्यांना माहिती नाही. त्या सोडवासोडव करण्यासाठी गेल्या, परंतु, ते दोघेही तिचे ऐकत नव्हते. त्यामुळे, त्यांनी त्यांच्या भावाला बोलावले. त्यांचा भाऊ आल्याचे पाहून ते दोघेही सत्तूर तेथेच टाकून पळून गेले. त्यांच्या पतीच्या डोक्यातून रक्त येऊन त्यांचा शर्ट रक्ताने भरला होता. त्यानंतर, त्यांनी त्यांच्या पतीला लोणंद येथील सरकारी दवाखान्यात नेले. पोलीसांनी त्यांचा जबाब नोंदवला.

**१२.** त्यांच्या उलटतपासात त्यांनी असे कथन केले आहे की, त्यांचे शिक्षण नववीपर्यंत झाले आहे. त्यांचे माहेर भादे येथील आहे. त्या वाठार कॉलनी येथे सुमारे १२ वर्षांपासून राहत आहेत. आरोपी क्र.१ हा सुद्धा वाठार कॉलनी येथे राहतो. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, त्यांचे पतीने त्यांना साक्ष कशी व काय द्यायची याची माहिती दिली. पोलीसांनी त्यांच्याकडे घटनेच्या दुसऱ्या दिवशी चौकशी केली. त्यांना उलटतपासात विचारण्यात आलेल्या इतर प्रश्नांची उत्तरे त्यांनी नाकारली.

**१३.** आरोपीविरुद्धचा गुन्हा शाबीत होणेकरीता अभियोग पक्षाने अभिलेखावर नोंदवलेला पुरावा पाहणे गरजेचे आहे. अभियोग पक्षाने आरोपीविरुद्धचा गुन्हा शाबीत करणेकरीता केवळ तीन साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदवली. अभियोग पक्षाने तपासलेले साक्षीदार क्र.१ हे फिर्यादी असून त्यांनी त्यांच्या तक्रारीप्रमाणे साक्ष नोंदवली. अभियोग पक्षाने तपासलेले साक्षीदार क्र.२ लक्ष्मण सिताराम साळुंखे (अ.सा.क्र.२) हे घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच असून त्यांनी हे मान्य केले आहे की, पोलीसांनी त्यांच्या समक्ष मोजमापे घेतली. परंतु, सदर मोजमापे कोठून घेतली, काय घेतली हे त्यांना सांगता येणार नाही. तसेच, त्यांना पोलीसांनी त्यांच्या नेमक्या किती सह्या घेतल्या हे सांगता आले नाही. तसेच, अभियोग पक्षाने तपासलेले साक्षीदार क्र.३ स्वाती संतोष महांगरे (अ.सा.क्र.३) ह्या प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून त्यांना त्यांच्या सरतपासामध्ये आरोपी क्र.२ चे नाव

सांगता आले नाही. तसेच, त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये हे मान्य केले की, त्यांचे पतीने त्यांना साक्ष कशी व काय द्यायची याची माहिती दिली. एकंदरीत सदर पुरावा पाहता अभियोग पक्षाने तपासलेले साक्षीदार क्र.१ हे फिर्यादी असून साक्षीदार क्र.३ ही फिर्यादीची पत्नी आहे. साक्षीदार क्र.२ हे घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच असून त्यांनी प्रत्यक्ष घटना पाहिलेली नाही. साक्षीदार क्र.२ याच्या साक्षीचे अवलोकन केले असता फिर्यादीच्या घराजवळ अनेक घरे होती. अभियोग पक्षाला पुरेशी संधी देऊनही अभियोग पक्षाने इतर कोणतेही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासले नाहीत. त्यामुळे, केवळ फिर्यादी व त्यांच्या पत्नीच्या साक्षीवर विसंबून राहून आरोपींना दोषी धरता येणार नाही. तसेच, अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदारांच्या साक्षीवरुन इतर कोणताही परिस्थितीजन्य पुरावा समोर आलेला नाही. सदर प्रकरण फौजदारी स्वरुपाचे असल्याने पूर्ण संशयापलीकडे शाबित होणे आवश्यक आहे. तसेच, अभियोग पक्षाला पुरेशी संधी देऊनही अभियोग पक्ष आरोपींना सदर खटल्याकामी हजर ठेवण्यास अपयशी ठरला आहे. आरोपींविरुद्ध वारंवार स्थायी अजामीनपात्र अधिपत्र व जाहीरनामा जारी केल्याचे दिसून येत आहे. परंतु, अभियोग पक्षास सर्व प्रयत्न करुनही आरोपींना सदर कामी हजर ठेवता आलेले नाही.

__१४.__ ***__सतिश मेहरा वि. दिल्ली ॲडमिनिस्ट्रेशन व इतर, १९९६ (९)एस. सी. सी. ७६६,__*** या न्यायनिवाड्यात मा. सर्वोच्च न्यायालयाने विषद केले आहे की, "*खटल्याकामी अंतिमतः शिक्षा होईल अशी स्थिती नाही असे जेव्हा न्यायाधीशांना निश्चितपणे वाटेल, त्यावेळी न्यायालयाने केवळ निकाल देण्याची औपचारिक प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता त्यांचा बहुमूल्य वेळ अशा खटल्यांमध्ये चौकशी घेणेत व्यर्थ खर्चू नये*". सदर खटल्यातील न्यायनिवाडयाचे अवलोकन केले असता व प्रस्तुत खटल्यातील बाबी पाहिल्या असता असे दिसून येते की, आरोपी क्र.२ हा गुन्हा घडल्यापासून फरारी आहे. त्यामुळे, केवळ आरोपी क्र.१ विरुद्ध दोषारोप नोंदवण्यात आला व तीन साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदवण्यात आली. त्यानंतर, आरोपी

क्र.१ हा देखील फरार झाला. त्यांच्या उपस्थितीची येणाऱ्या काळात कोणतीही खात्री नाही. तसेच, सदर प्रकरणातील साक्षीदारांना वारंवार समन्स बजावणी होऊन देखील ते न्यायालयात साक्ष कामी हजर राहिलेले नाहीत. त्यामुळे, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५३(७) अन्वये आरोपीच्या अनुपस्थितीत न्यायनिर्णय घोषीत करणे उचित ठरेल.

**१५.** प्रस्तुत प्रकरण १४ वर्षे जुने असून आरोपी मिळून येत नाहीत. शिवाय, आरोपींविरुध्द कोणताही सबळ पुरावा या कामी अभियोग पक्षाने अभिलेखावर आणलेला नाही. अशा परिस्थितीत, प्रकरण पुढे चालू ठेवणे योग्य होणार नाही. या सर्व परिस्थितीचा विचार करता, अभियोग पक्ष वाजवी संशयाच्या पलीकडे जावून दोषारोप शाबीत करण्यास अपयशी ठरला आहे, अशा निष्कर्षास मी येवून पोहोचली आहे. म्हणून, मुद्दा क्र.१ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ करीता**

**१६.** वरील विवेचनावरुन अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द असलेला दोषारोप निःसंशय शाबीत होईल एवढा पुरावा अभिलेखावर दिलेला नाही. म्हणून आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करणे आवश्यक आहे. सदर गुन्ह्यातील एम. आर. नं.३३/२०१२ अन्वये जप्त असलेला मुद्देमाल गुन्हा घडलेले ठिकाणी फरशीवर पडलेले रक्ताचे डाग कापसाचा बोळा ओला करुन काढून घेतलेले व एका काचेच्या बाटलीत ठेवलेले व पायातील काळेबंदाची चप्पल हे मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नाश करणे योग्य व न्यायोचीत होईल. तसेच, एम. आर. नं.३३/२०१२ अन्वये जप्त असलेला मुद्देमाल दोन लोखंडी सत्तुर हे अपिल कालावधीनंतर मा. जिल्हाधिकारीसो, सातारा यांच्याकडे योग्य त्या कारवाईकरीता पाठविणे योग्य व न्यायोचीत होईल. अशा प्रकारे वरील सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्र.२ चे उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

# आदेश

१. आरोपी क्र.१ राजु ऊर्फ निरंजन प्रकाश नाईक व आरोपी क्र.२ राकेश सुरेश नाईक यांची भारतीय दंड विधान कलम ३२४ सह कलम ३४ या गुन्ह्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. एम. आर. नं.३३/२०१२ अन्वये जप्त असलेला मुद्देमाल गुन्हा घडलेले ठिकाणी फरशीवर पडलेले रक्ताचे डाग कापसाचा बोळा ओला करुन काढून घेतलेले व एका काचेच्या बाटलीत ठेवलेले व पायातील काळेबंदाची चप्पल हे मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावे.

३. एम. आर. नं.३३/२०१२ अन्वये जप्त असलेला मुद्देमाल दोन लोखंडी सत्तुर हा अपिल कालावधीनंतर मा. जिल्हाधिकारीसाो, सातारा यांच्याकडे योग्य त्या कारवाईकरीता पाठविण्यात यावा.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वयेच्या तरतुदीनुसार वरिष्ठ न्यायालयात अपीलामध्ये किंवा न्यायनिर्णयाविरुध्द याचिकेमध्ये नोटीस मिळाल्यावर हजर राहण्याकरिता आरोपी क्र.१ ने पूर्वी दिलेला जामीन अपील कालावधीपर्यंत कायम करण्यात येतो.

५. सदर कामी आरोपीविरुध्द काढलेले स्थायी अजामीनपात्र अधिपत्र परत मागवण्यात येते.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. )

SHRUTI GIRISH KUVALEKAR

Digitally signed by SHRUTI GIRISH KUVALEKAR
Date: 2026.06.09 16:48:47 +0530

(श्रीमती एस. जी. कुवळेकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खंडाळा

दिनांकः ०९.०६.२०२६
ठिकाणः खंडाळा